# पुणे विद्यापीठ

**फोन नं. : ०२० - २५६०१२१७**
**फॅक्स नं. : ०२० - २५६०१२०१**
**गणेशखिंड, पुणे - ४११००७**

संदर्भ क्र.:- परीक्षा समन्वय/१४१८ दि. २६/१२/२०१२

## <u>महत्वाचे</u>

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक
पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/
मान्यताप्राप्त संस्था

विषयः- परीक्षा अर्ज भरण्याचे दृष्टीने सूचना.

महोदय/महोदया,

एप्रिल/मे २०१३ मध्ये होणा-या परीक्षांचे Schedule विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने परीक्षा अर्ज सादर करतांना येणा-या अडचणी विचारात घेऊन खालीलप्रमाणे सूचना माहितीसाठी कळविण्यात येत आहे.

१) प्रथम वर्षाच्या ज्या परीक्षा महाविद्यालयांमार्फत घेतल्या जातात, त्या परीक्षांचे अर्जाबाबत पूर्वीचे पध्दतीने महाविद्यालयाने त्यांचे पातळीवर कार्यवाही करावयाची आहे. याबाबतीतील कोणताही परीक्षा अर्ज Online द्वारे उपलब्ध नाही.

२) शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत परीक्षेचे (B.Ed, B.A.B.Ed. व B.Sc.B.Ed.) परीक्षांचे अर्ज देखील यावेळेस पूर्वीच्या पध्दतीनेच घेण्यात यावेत. परीक्षा अर्ज (pdf) संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

३) २००८ पॅटर्न पासून पुढील इतर सर्व अर्ज Online पध्दतीने स्वीकारण्यात येणार आहेत.

परीक्षा शेडयुल मध्ये त्यापूर्वीचे सर्व पॅटर्नचे अर्ज पूर्वीच्या पध्दतीने pdf download करुन सादर करावयाचे आहेत. प्रसिध्द केलेल्या अर्ज स्वीकृतीच्य अंतिम तारखेच्या दहा दिवस अगोदर Online अर्ज संकेत स्थळावरुन भरण्यास अपलब्ध होतील. अर्ज भरण्याची अंतिम मुदत, विलंब शुल्कासह अर्ज भरण्याची अंतिम मुदत

शेडयुलमध्ये प्रसिध्द केल्यानुसारच राहतील. त्यानुसार अर्ज भरण्यात यावेत. त्या त्या अंतिम दिनांकानंतर पाच दिवसात ते ते अर्ज विद्यापीठात सादर करणे अनिवार्य राहील.

४) गुणवत्ता सुधार ( class improvement ) साठी अर्ज करतांना पूर्वीचे पध्दतीने अर्ज करावयाचा असून, Online द्वारे अर्ज करु नये.

विद्यार्थ्यांनी Online द्वारे अर्ज भरण्यासाठी महाविद्यालयांनी महाविद्यालयात सुविधा उपलब्ध करुन देऊन, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. **महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी** यांनी हया सर्व बाबी संबंधितांच्या निदर्शनास आणून दयाव्यात व नियोजित वेळेत परिक्षा अर्ज प्रक्रिया पूर्ण होण्याची दक्षता घ्यावी.

परीक्षा नियंत्रक